# सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई.

**SINDHUDURG SAHAKARI BANK LTD., MUMBAI.**

**नोंदणीकृत पत्ता : हरहरवाला बिल्डिंग क्र.१, साने गुरुजी मार्ग, गणेश टॉकीज समोर, लालबाग, मुंबई - ४०० ०१२.**


## १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

**सिंधुदुर्ग सहकारी बँक लि.**, मुंबई या बँकेच्या सभासदांची सन २०१५-२०१६ सालची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. ०६-०८-२०१६** रोजी संध्याकाळी ठीक ५.०० वाजता, खालील विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेण्याकरिता, बँकेचे अध्यक्ष **मा. श्री. हरिष बा. परब** यांच्या अध्यक्षतेखाली, **महात्मा गांधी सभागृह, राष्ट्रीय मिल मजदुर संघ,** २ रा मजला,गं. द. आंबेकर मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१२ येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### : सभेपुढील विषय :

१) दिनांक १८ जुलै २०१५ रोजी संपन्न झालेल्या बँकेच्या सन २०१४-२०१५ सालच्या १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल तसेच लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्वीकृत करणे.

३) बँकेचा सन २०१५-२०१६ सालचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल स्वीकारणे.

४) संचालक मंडळाने अहवालात शिफारस केलेल्या निव्वळ नफ्याच्या विभागणीस मंजुरी देणे.

५) सन २०१६-२०१७ सालाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

६) सन २०१६-२०१७ सालाकरिता अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) सन २०१६-२०१७ सालाकरिता शासनाने मंजूर केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.

८) लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली अनुत्पादित कर्जे वसुलीचा अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करण्यास मान्यता देणे.

९) आजच्या वार्षिक साधारण सभेस अनुपस्थित सभासदांची रजा मंजूर करणे.

१०) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**मुंबई :** **(अ. व. प्रभुदेसाई)**

**दिनांक : १२-०७-२०१६** मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभा त्याच जागी, त्याच दिवशी संध्याकाळी ठीक ५.३० वाजता त्याच कामाकरिता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

---

## :विशेष सूचना :

१) दिनांक १८ जुलै २०१५ रोजी झालेल्या बँकेच्या १७ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त ज्या सभासदांना पाहावयाचे असेल त्यांनी बँकेच्या लालबाग येथील कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटून कार्यालयीन वेळेत पाहावे.

२) सभेच्या अनुषंगाने सभासदांना काही माहिती हवी असेल किंवा सूचना, प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील त्यांनी लेखी स्वरुपात दि.०४-०८-२०१६ पर्यंत अगर तत्पूर्वी बँकेच्या लालबाग येथील मुख्य कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

३) सभासदाने सभेस येताना कृपया सूचना पत्रिका घेऊन यावी.

४) सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या नावात अगर पत्त्यात बदल झाला असल्यास त्यांनी तसे बँकेस लेखी कळवावे, म्हणजे बँकेस आपली सभासद यादी अद्ययावत करता येईल व आपणाशी संपर्क साधणे शक्य होईल.

५) जे सभासद दिवंगत झाले असतील त्यांच्या वारसांनी बँकेस याबाबत त्वरीत लेखी माहिति योग्य दाखल्यांसह कळवावी.

६) दि. ३१-०३-२०१३ अखेरचा लाभांश दि. ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत न नेल्यास पोटनियम क्र. ५८ (ड) नुसार बँकेच्या गंगाजळीत जमा करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

७) प्रतिवर्षी बँकेच्यावतीने शैक्षणिक, क्रीडा व विशेष नैपुण्यप्राप्त सभासद पाल्यांचा गौरव करण्यात येतो. तरी ज्या सभासदांच्या पाल्यांना एस्. एस्. सी. / एच्.एस्.सी. परीक्षेत ७५% पेक्षा अधिक व पदवी परीक्षेत ७०% पेक्षा अधिक गुण मिळाले असतील त्यांनी दि. **३१-०८-२०१६** पूर्वी त्यांची नावे प्रमाणित गुणपत्रिकेसह बँकेत आणून द्यावीत.

# अध्यक्षांचे मनोगत

**सन्माननीय बंधू - भगिनींनो,**

गेली २-३ वर्षे मनोगतामध्ये सतत मी माझे विचार मांडत आहे आणि भविष्यांतील अडचणींचा वेध घेण्याचा प्रयत्न करुन सभासदांना सजग करण्याचे काम सातत्याने करीत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ''**सहकार**'' हा भारतीय अर्थव्यवेस्थेचा मुळ गाभा आहे हे ओळखले, मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आणि सन १९५१ ते १९५४ या काळात भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. सहकाराचे महत्व जाणून प्रत्येक खेडेगावात पंचायत, सहकारी संस्था यांची आवश्यकता असल्याचे धोरण ठरवले. 'सहकार' हा विषय राज्यांच्या अखत्यारीत देण्यात आला व त्या धोरणानुसार प्रत्येक राज्यानी १९६० साली आपापले सहकार कायदे बनविले. पंडितजींच्या कारकीर्दीत सहकाराला व ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले गेले. परंतु २७ मे १९६४ साली पंडितजींचे निधन झाले आणि दोन वर्षाच्या कालावधीच्या आतच म्हणजेच दिनांक १ मार्च १९६६ सालापासून बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट सहकारी संस्थांना लागू करण्यात आला. सहकारावर नियंत्रण ठेवण्याचे काम सुरु करण्यात आले व सहकारी बँकांवर दुहेरी नियंत्रण सुरु झाले.

सन १९९१ नंतर मुक्तअर्थव्यवस्था, उदात्तीकरण व खाजगीकरणाच्या सरकारच्या अट्टाहासापायी पाश आवळला जात आहे व याच पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने डेप्युटी गव्हर्नर माननीय श्री. आर. गांधी यांच्या नेतृत्वाखाली हाय पॉवर कमिटीची स्थापना केली. या हाय पॉवर कमिटीने आपला अहवाल सादर केला व अहवालातील शिफारशी रिझर्व्ह बँकेने दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी अधिकृत प्रसिध्दीपत्रकाद्वारे प्रसिध्द केल्या. सदरच्या अहवालातील शिफारशी नुसार पहिलीच शिफारस अशी आहे की, ज्या बँकांचा व्यवसाय २० हजार कोटींचा आहे अशा मोठ्या व सक्षम बँकांना व्यवसाय वाढवायचा असेल तर त्यांनी त्यांचे रुपांतर व्यापारी बँकेत करावे अशी सूचना केली आहे. भविष्यात या शिफारसीचा दुसरा अर्थ ''ज्या बँकांचा व्यवसाय २० हजार कोटींपेक्षा कमी आहे त्या बँका सक्षम नाहीत'' असा होऊ शकेल. १७ व्या वार्षिक अहवालात आम्ही पुढील काळ हा ''सहकार-राजा रात्र वैऱ्याची आहे जागा रहा'' असे नमुद केले होते याची प्रचीती ह्या हाय पॉवर कमिटीच्या अहवालाने दिली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकात खालील बाबींचा समावेश केला आहे. या शिफारशींमुळे भविष्यात शाखाविस्तारावर परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१) रु. २० हजार कोटी पर्यंत उलाढाल असलेल्या सहकारी बँकांना खाजगी व्यापारी बँकेत रुपांतर करण्यास मंजुरी.
२) रु. २० हजार कोटींपेक्षा कमी व्यवसाय असलेल्या बँकांना स्वेच्छेने लहान व्यापारी बँकेमध्ये रुपांतर करणे.
३) केवळ सक्षम व मोठ्या पतसंस्थाना नवीन बँकिंग परवाना देण्याबाबत विचार.
४) निवडून आलेल्या संचालक मंडळाबरोबरच रिझर्व्ह बँकेच्या संमतीने बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या व्यवस्थापकीय मंडळाची नेमणूक करणे व बँकेवर नियंत्रण ठेवणे.
५) नागरी सहकारी बँकांसाठी नवीन निकष
६) ठेवीदारांना संचालक मंडळावर प्रतिनिधीत्व देणेसाठी उपविधीमध्ये बदल करणे.

एकूणच गेल्या ३-४ वर्षामध्ये नागरी सहकारी बँकांमध्ये आर्थिक सुधारणा व शिस्त यावी यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांवर अनेक निर्बंध लागू केले आहेत आणि अशा परिस्थितीत आपण वाटचाल करत आहोत. अहवाल सालात बँकेने ६२.५१ लाख करोत्तर नफा मिळविला आहे. या सर्वांचे श्रेय अर्थातच सर्व सभासद, ठेवीदार व कर्जदारांचे आहे.

आपण आपले सहकार्य असेच चालू ठेऊया आपण सर्वांनी बँकेच्या सक्षमतेसाठी कटीबध्द होऊया.

।। जय सहकार ।।

**हरिष बा. परब**

अध्यक्ष

# ❖ संचालक मंडळाचा अहवाल ❖

**सन्माननीय बंधू - भगिनींनो,**

बँकेचा १८ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा – तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करीत आहोत.

बँकेच्या सांपत्तिक स्थितीचा तुलनात्मक तक्ता आपल्या अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

**तुलनात्मक सांपत्तिक स्थिती** (रु. लाखात)

| ३१-०३-१५ | भांडवल व देणी | ३१-०३-१६ | ३१-०३-१५ | जिंदगी व येणी | ३१-०३-१६ |
|---|---|---|---|---|---|
| १७६.१५ | भाग भांडवल | २०८.५३ | ५५.२३ | रोख | २१.३४ |
| ३६८.७७ | राखीव व इतर निधी | ४२०.०९ | ३४९.६६ | बँकांतील शिल्लक | ५६९.५५ |
| २,३१६.९६ | ठेवी | २,६४८.२८ | ८७३.४८ | गुंतवणूक | ९७३.२९ |
| १३१.०५ | इतर देणी | १७३.२७ | १,५५३.३४ | कर्जे व येणी | १,७११.९४ |
| ५१.३६ | नफा | ६२.५३ | २१२.५८ | इतर जिंदगी | २३६.५८ |
| ३,०४४.२९ | | ३,५१२.७० | ३,०४४.२९ | | ३,५१२.७० |

**भाग भांडवल :-** दि. ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचे भाग भांडवल रु. १७६.१५ लाख होते. अहवालसालात बँकेच्या भाग भांडवलात रु. ३२.३८ लाखांनी वाढ झाली असून दि. ३१ मार्च २०१६ अखेर २०८.५३ लाख झाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत ही वाढ १८.३८% ने झाली आहे. संचालक मंडळाच्या प्रयत्नाने आणि सर्व सभासदांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच ही वाढ शक्य झाली आहे. सर्व सभासदांनी यापुढेही असेच सहकार्य करुन भागभांडवल वाढविण्यास मदत करावी ही विनंती.

**सभासद संख्या :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर एकूण सभासद संख्या ६१८४होती. अहवाल सालात १८९ नवीन सभासद झाले असून ४७ सभासदांनी सभासदत्वाचे राजीनामे दिले. ३१ मार्च २०१६ अखेर बँकेचे एकूण सभासद ६३२६ आहेत. तसेच नाममात्र सभासदांची संख्या ३८ आहे.

**भांडवल पर्याप्तता (CRAR) :-** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या भांडवल पर्याप्तता धोरणानुसार, भांडवल पर्याप्ततेचे गुणोत्तर प्रमाण ९% राखणे आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे गुणोत्तर प्रमाण (CRAR) २९.८४% राखले असून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या या निकषाचे बँकेने पालन केलेले आहे.

**राखीव निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचा राखीव निधी रु. ७६.९० लाख होता. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर त्यात गतवर्षाचा नफा, सन २०१२ अखेरचा न नेलेला लाभांश आणि प्रवेश फी अशी एकूण रु. १९.४४ लाखांनी वाढ होऊन बँकेचा राखीव निधी रु. ९६.३४ लाख झाला आहे. गतवर्षाच्या तुलनेत राखीव निधीत २५.२८% ने वाढ झाली आहे.

**इमारत निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचा इमारत निधी रु. ८२.०० लाख होता. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर त्यात गतवर्षाचा नफा व अहवाल सालातील नफ्यातील रक्कम जमा करुन रु. १५.०० लाखांनी वाढ झाली आहे. त्यामुळे बँकेचा इमारत निधी रु. ९७.०० लाख झाला आहे. अहवालसाली इमारत निधीत १८.२९% ने वाढ झाली आहे.

**बुडीत व संशयास्पद कर्ज निधी :-** दि. ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचा बुडीत व संशयास्पद कर्ज निधी रु. ४७.५० लाख होता. अहवालसालात रु. ३.५० लाखांची तरतुद करण्यात आली. त्यामुळे बँकेचा बुडीत व संशयास्पद कर्ज निधी रु. ५१.०० लाख झाला आहे. थकीत कर्जदारांनी आपल्या थकीत कर्जाची रक्कम त्वरीत भरुन बँकेस सहकार्य करावे. तसेच ज्या सभासदांनी बँकेकडून कर्जे घेतली आहेत त्यांनी त्यांच्या कर्जाचे हप्ते नियमित भरुन थकबाकी राहणार नाही याची खबरदारी घ्यावी व बँकेस सहकार्य करावे ही विनंती.

**इतर निधी :-** दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षात बँकेचे इतर निधी रु. २८.६० लाख आहेत.

**ठेवी :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेकडे रु. २,३१६.९६ लाखांच्या विविध प्रकारच्या ठेवी होत्या. अहवालसालात ठेवींमध्ये रु. ३३१.३२ लाखांनी वाढ झाली असून दि. ३१ मार्च २०१६ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. २,६४८.२८ लाख झाल्या आहेत. गतवर्षाच्या तुलनेत अहवालसाली ठेवींमध्ये १४.३०% नी वाढ झाली आहे.

**ठेव विमा योजना :-** बँकेच्या सर्व ठेवीदारांच्या रुपये एक लाखा पर्यंतच्या ठेवी ''डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरेंटी कार्पोरेशन' यांच्या योजनेखाली सुरक्षित आहेत. ठेवीदारांचे हित लक्षात घेऊन बँकेने विम्याचे हप्ते नियमितपणे भरले आहेत.

**गुंतवणूक :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. ८७३.४८ लाख होती. या गुंतवणुकीपैकी रु. ६३८.८३ लाखांची गुंतवणूक सरकारी कर्ज रोख्यांमध्ये केली होती.अहवालसालात बँकेने रु. ९९.८१ लाखांची गुंतवणूक केली आहे. दि. ३१ मार्च २०१६ अखेर सरकारी ऋणपत्रांमध्ये केलेली एकूण गुंतवणूक रु. ७३८.७६ लाखांची असून अन्य गुंतवणूक रु. २३४.५३ लाख आहे. ३१ मार्च २०१६ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. ९७३.२९ लाख झाली आहे.

**कर्जे :-** दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेची एकूण येणे कर्जे रु.१,५५३.३४ लाखांची होती. अहवाल वर्षात रु. ४५९.६९ लाखांचे कर्ज वाटप केले असून रु. ३०१.०९ लाख कर्जांची वसुली झाली आहे. दि. ३१ मार्च २०१६ अखेर रु. १,७११.९४ लाखांची कर्जे येणे बाकी आहेत. अहवाल वर्षात कर्ज व्यवहारात रु. १५८.६० लाखांनी वाढ झाली आहे. वाढीचे गतवर्षाच्या तुलनेत शेकडा प्रमाण १०.२१% आहे.

**प्राधान्य घटक व दुर्बल घटकांना दिलेली कर्जे :-** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ३१ मार्च २०१६ अखेर बँकेने रु. ७४६.३८ लाखांची कर्जे प्राधान्य घटकांना वितरित केली आहेत. प्राधान्य घटकांना दिलेल्या कर्ज रक्कमेचे गतवर्षीच्या एकूण कर्ज रक्कमेशी शेकडा प्रमाण ४८.०५% आहे. प्राधान्य घटकापैकी रु. २४१.७६ लाखांची कर्जे दुर्बल घटकांना वितरित करण्यात आली आहेत. दुर्बल घटकांना वितरित करण्यात आलेल्या कर्जाचे प्राधान्य घटकांना वितरित केलेल्या कर्जाशी शेकडा प्रमाण ३२.३९% आहे तर गतवर्षीच्या एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण १५.५६% आहे.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार संचालक व त्यांच्या नातेवाईक यांना अहवाल वर्षात कर्ज दिलेले नाही. परंतु मागील संचालक मंडळाची मुदत दिनांक १८-०८-२०१५ रोजी संपुष्टात आल्यामुळे सन २०१५-१६ ते २०२०-२०२१ या कालावधीसाठी नवीन संचालक मंडळाची निवडणूक झाली असून विद्यमान संचालकांच्या नातेवाईकांना निवडणूकपूर्व काळात दिलेल्या कर्जाची विगतवारी खालील तक्त्यात सादर करीत आहोत.

| अनु. क्र. | तपशील | ०१-०४-२०१५ रोजी येणे रक्कम | अहवाल वर्षात कर्जाऊ दिलेली रक्कम | अहवाल वर्षात परफेड केलेली रक्कम | ३१-०३-२०१६ रोजी येणे रक्कम | येणे रक्कमेपैकी थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | नातेवाईक | ३,११,७३८ | ५,००,००० | ७५,४१५ | ७,३६,३२३ | ०.०० |

**अनुत्पादित कर्जे एक दृष्टीक्षेप:-** अहवालसालात एकूण अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ३.८४% असून निव्वळ अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ०.८९% आहे.

**अनुत्पादित कर्जाचा मागील तीन वर्षाचा तक्ता** (रु. लाखात)

| | ३१.०३.२०१४ | ३१.०३.२०१५ | ३१.०३.२०१६ |
|---|---|---|---|
| मागील वर्षाची अनुत्पादित कर्ज रक्कम | ८१.३७ | ६६.६७ | ५७.४८ |
| अहवाल वर्षात केलेली वसुली | २५.६३ | २४.०९ | ८.१५ |
| | **५५.७४** | **४२.५८** | **४९.३३** |
| अहवाल वर्षात अनुत्पादित कर्जात समाविष्ट झालेली कर्जे | १०.९३ | १४.९० | १६.४९ |
| वर्ष अखेर अनुत्पादित कर्जे | **६६.६७** | **५७.४८** | **६५.८२** |
| अनुत्पादित कर्जाची तरतूद | ४५.५० | ४७.५० | ५१.०० |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | **२१.१७** | **९.९८** | **१४.८२** |
| बँकेची एकूण कर्जे | ११७६.०० | १५५३.३४ | १७११.९४ |
| अनुत्पादित कर्जांचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | ५.६७% | ३.७०% | ३.८४ % |
| निव्वळ अनुत्पादित कर्जाचे निव्वळ कर्जाशी शेकडा प्रमाण | १.८७% | ०.६६% | ०.८९ % |

## नफा तोटा खाते

**उत्पन्न व खर्चाचे संक्षिप्त विश्लेषण तसेच मागील वर्षातील उत्पन्न व खर्चाशी तुलनात्मक आकडेवारी** (रु. लाखात)

| तपशील | ३१-०३-२०१५ | ३१.०३.२०१६ | अहवाल सालातील वाढ | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मिळालेले व्याज | ३०१.११ | ३५७.९० | ५६.७९ | १८.८६ % |
| दिलेले व्याज | १६३.०९ | १८२.९३ | १९.८४ | १२.१७ % |
| निव्वळ व्याजाचे उत्पन्न | १३८.०२ | १७४.९७ | ३५.९५ | २६.७७ % |
| अन्य उत्पन्न | १७.९८ | १३.१६ | -४.८२ | -२६.८१ % |
| एकूण उत्पन्न | १५६.०० | १८८.१३ | ३२.१३ | २०.६० % |
| व्यवस्थापन खर्च | ७६.६९ | ९१.४२ | १४.७३ | १९.२१ % |
| करपूर्व नफा | **७९.३१** | **९६.७१** | **१७.४०** | २१.९४ % |
| कर व अन्य तरतुदी | २७.९७ | ३४.२० | ६.२३ | २२.२७ % |
| निव्वळ नफा | **५१.३४** | **६२.५१** | **११.१७** | **२१.७६ %** |

**नफा विभागणी :-** दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेस रु. ६२,५१,२३६.८२ लाख नफा झाला असून मागील वर्षीचा शिल्लक नफा रु. १,८५७.२३ मिळविल्यानंतर एकूण निव्वळ नफा रु. ६२,५३,०९४.०५ झाला आहे. नफ्याची विभागणी खालील प्रमाणे करावी अशी संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राखीव निधी (२५%) | रु. | १५,६५,०००.०० |
| २) | लाभांश तरतूद (१२%) शिफारस | रु. | २२,५०,०००.०० |
| ३) | इमारत निधी | रु. | १५,००,०००.०० |
| ४) | लाभांश समकरण निधी | रु. | १,००,०००.०० |
| ५) | गुंतवणूक चढउतार निधी | रु. | २,२५,०००.०० |
| ६) | निवडणूक निधी | रु. | ८०,०००.०० |
| ७) | शैक्षणिक निधी | रु. | ५०,०००.०० |
| ८) | सभासद कल्याण निधी | रु. | १००,०००.०० |
| ९) | कर्मचारी कल्याण निधी | रु. | ५०,०००.०० |
| १०) | तंत्रज्ञान विकास निधी | रु. | ८०,०००.०० |
| ११) | संभाव्य/आकस्मित खर्च निधी | रु. | २,१५,०००.०० |
| १२) | धर्मादाय निधी | रु. | ३५,०००.०० |
| | पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ३,०९४.०५ |
| | **एकूण** | **रु.** | **६२,५३,०९४.०५** |

**संचालक मंडळ :-** आपल्या संचालक मंडळाचा कालावधी लवकरच संपुष्टात येत असून सन २०१५-२०१६ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहिर होणार आहे. ९७ व्या घटनादुरुस्तीमुळे संचालक सदस्यांची संख्या १७ वरुन १३ झाली आहे. तरी सन २०१० मध्ये आपण संचालक मंडळाला अविरोध निवडून दिलेत त्याच प्रमाणे पुढील संचालक मंडळाच्या निवडणूकीत आम्हाला अविरोध निवडून द्यावे असे आवाहन १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना केले होते.

सदरच्या आवाहनास प्रतिसाद देऊन सन २०१५-२०१६ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी विद्यमान संचालक अविरोध निवडून आले आहेत हे नमुद करतांना मला अतिशय आनंद होत आहे. आपण या संचालक मंडळावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू याबद्दल आपण खात्री बाळगा.

व्यवसायायातील स्पर्धा, सहकार कायदा, भारतीय रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे या सर्वांचा विचार करुन संचालक मंडळाला बँकेचा कारभार करावा लागत असून ग्राहक सेवा चांगली देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न संचालक मंडळ करीत आहे.

बँकेने आय. डी. बी. आय. बँकेच्या परस्पर सहकार्याने डिमांड ड्राफ्ट, RTGS/NEFT या सारख्या सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

अहवाल सालात बँकेने SMS सेवा सुरु केली असून ग्राहकांनी भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile Number) व अन्य माहिती बँकेस विहित नमुन्यात सादर करावी जेणे करून आपणास या सेवेचा लाभ घेता येईल.

सभासद, ठेवीदार, खातेदार यांना अधिकाधीक चांगली सेवा देता यावी यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील असून त्याचा पाठपुरावा संचालक मंडळ करीत आहे.

## संचालक मंडळाच्या मासिक सभा :-

अहवालसाली संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा झाल्या. मासिक सभेतील संचालकांची उपस्थिती खालील प्रमाणे : अहवालसाली संचालक मंडळाच्या उपसमित्यांच्या एकूण १७ सभा घेण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

| संचालकाचे नाव | पद | उपस्थिती | संचालकाचे नाव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| श्री. हरिष बा. परब | अध्यक्ष | १२ | श्री. शांताराम अ. गोवळकर | संचालक | ५ |
| श्री. वसंत बा. पांचाळ | उपाध्यक्ष (दि.१८-८-२०१५ पर्यंत) | ५ | श्री. गणपत स. पांडलोसकर | संचालक | १० |
| श्री. ल. वि. तावडे | संचालक | ५ | श्री. रमेश रा. पवार | संचालक | ५ |
| श्री. प्रकाश रा. वराडकर | संचालक | १२ | श्री. श्रीकृष्ण गो. हडकर | संचालक | ४ |
| श्री. मोहन भा. तळेकर | तज्ज्ञ संचालक | १२ | श्री. स्वप्निक सु. फाटक | संचालक | ५ |
| श्री. दिगंबर रा. शिरोडकर | तज्ज्ञ संचालक | ७ | श्री. संभाजी शि. मंडले | संचालक | ८ |
| श्री. जयवंत श्री. नरसाळे | संचालक | ९ | सौ. जयश्री सु. परुळकर | संचालिका | ५ |
| श्री. दिवाकर रा. दळवी | उपाध्यक्ष (दि.२-९-२०१५ पासून) | ९ | सौ. शामल दि. चव्हाण | संचालिका | ४ |
| श्री. दिनकर हि. तावडे | संचालक | १२ | श्री. विजय बुधाजी नाईक | संचालक | ५ |
| सौ. पल्लवी अ. पंडित | संचालिका | ७ | सौ. प्रतिक्षा प्र. परब | संचालिका | ७ |

**(मालमत्ता व देणी व्यवस्थापन समितीमध्ये फक्त अधिकाऱ्यांचा समावेश आहे.)**

| | | | |
|---|---|---|---|
| **कर्ज समिती सभा** | **९** | **लेखापरीक्षण समिती सभा** | **४** |
| **प्रशासन समिती सभा** | **४** | **मालमत्ता व देणी व्यवस्थापन सभा** | **४** |

**भारतीय रिझर्व्ह बँक तपासणी :-** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकारी सौ. शैलजा कडेमनी यांनी दिनांक ३१ मार्च २०१६ अखेरच्या आर्थिक स्थितीच्या आधारावर बँकेची १० वी तपासणी दिनांक ८-७-२०१६ ते १४-०७-२०१६ या कालावधीत केली आहे. अद्याप तपासणी अहवाल बँकेस प्राप्त झालेला नाही.

**वैधानिक लेखापरीक्षण :-** दिनांक १८-०७-२०१५ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेने शासनाने प्रसिद्ध केलेल्या नामिकेमधुन मे. गडकरी अॅन्ड कंपनी सनदी लेखापाल यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक केली होती. त्यांनी दिनांक ०१-०४-२०१५ ते दिनांक ३१-०३-२०१६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम पूर्ण केले असून त्यांनी अहवालसाली बँकेला **'अ'** वर्ग दिला आहे. **गेली नऊ वर्षे आपली बँक सातत्याने 'अ' वर्ग मिळवत आहे.**

**अंतर्गत लेखापरीक्षण :-** सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम मे. एस्. एस्. राणे अॅन्ड कं., चार्टर्ड अकौंटंट यांनी केले असून त्यांचा लेखापरीक्षण अहवाल बँकेस प्राप्त झाला आहे.

**विद्यार्थी गुणगौरव सोहळा :** - अहवालसालात बँकेने शैक्षणिक, क्रीडा व विशेष नैपुण्य प्राप्त सभासद पाल्यांचा गुणगौरव समारंभ शनिवार दि. ०७-११-२०१५ रोजी सायं. ५.०० वाजता महाराष्ट्र सेवा मंडळ (ट्रस्ट), १ ला मजला, ४४ गणेश गल्ली, लालबाग, परळ, मुंबई - ४०० ०१२ येथे आयोजित केला होता. या समारंभास प्राचार्य मा. श्री. विजय पाटकर सातेरी एच्. आर. डी. सर्व्हिसेस या संस्थेचे मालक व व्यवस्थापन सल्लागार यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांचे हस्ते बँकेच्या सभासदांच्या एकूण २९ पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

**श्रध्दांजली :-** आपल्या बँकेचेतज्ज्ञ संचालक श्री. दिगंबर राजाराम शिरोडकर यांना बुधवार दिनांक ०६-०१-२०१६ रांजी देवाज्ञा झाली त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. तसेच अहवाल सालात दिवंगत झालेल्या ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, ठेवीदार आणि हितचिंतक यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत, तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सर्व सभासद, खातेदार, हितचिंतक व संचालक मंडळ सहभागी आहे.

**ऋण निर्देश :-** स्थानिक विद्यमान आमदार मा. श्री. अजय चौधरी, माजी आमदार मा. श्री. बाळा नांदगावकर, माजी आमदार मा. श्री. दगडू सकपाळ, विद्यमान नगरसेवक मा. श्री. नाना आंबोले, भारतीय रिझर्व्ह बँक, शहरी बँक विभाग आणि नागरी बँक विभागाचे अधिकारी, माननीय सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे, माननीय विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण विभाग) सहकारी संस्था, मुंबई विभाग, माननीय श्री. मंगेश तिटकारे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई (१) शहर, तसेच सर्व उपनिबंधक सहकारी संस्था व त्यांचे सहकारी, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग १, सहकारी संस्था मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक असोसिएशन लिमिटेड मुंबई, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लिमिटेड, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे पदाधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक काळाचौकी पोलीस ठाणे व त्यांचे सहकारी, वैधानिक, अंतर्गत, सतत व समवर्ती लेखापरीक्षक या सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

त्याच प्रमाणे बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार व हितचिंतक यांनी बँकेप्रती व्यक्त केलेला विश्वास व दिलेल्या सहकार्यामुळेच अहवाल काळात संचालक मंडळाला प्रगती साधता आली यामुळे त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. यापुढे देखील सर्व सभासद, ठेवीदार आणि खातेदार संचालक मंडळाला सहकार्य करतील अशी आम्हास खात्री आहे. बँकेचे अधिकारी व सर्व कर्मचारी वर्ग यांनी समर्पणाच्या भावनेतून केलेल्या अविरत सेवेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच अनेक व्यक्ती व संस्थांनी वेळोवेळी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

संचालक मंडळाच्यावतीने

**मुंबई :**

**हरिष बा. परब**

अध्यक्ष

**दिनांक : १२-७-२०१६**

## भांडवल पर्याप्तता :- तुलनात्मक तक्ता

(रु. लाखात)

| तपशील | ३१.०३.२०१५ | ३१.०३.२०१६ |
|---|---|---|
| **१) स्वनिधी प्रथम भाग** | | |
| अ) वसूल भाग भांडवल | १७६.१५ | २०८.५३ |
| ब) राखीव निधी व अतिरिक्त शिल्लक | | |
| वैधानिक निधी | ७६.९० | ९६.३४ |
| इमारत निधी | ८२.०० | ९७.०० |
| नफा | ५१.३६ | ६२.५१ |
| **वजा** तरतूद | १९.५० | २२.५० |
| एकूण निधी (ब) | **१९०.७६** | **२३३.३५** |
| **एकूण निधी (अ + ब)** | **३६६.९१** | **४४१.८८** |
| **२) स्वनिधी द्वितीय भाग** | | |
| अन्य निधी | १२.७९ | २०.३५ |
| उत्पादित कर्जांसाठी केलेली सर्वसामान्य तरतूद | ३.८० | ४.२५ |
| गुंतवणूक चढउतार निधी | २.९० | ४.०० |
| | **१९.४९** | **२८.६०** |
| **एकूण निधी (१ + २)** | **३८६.४०** | **४७०.४८** |
| **जोखीम मालमत्ता** | | |
| स्वनिधीचे जोखीम मालमत्तेशी शेकडा प्रमाण | **२६.००%** | **२९.८४%** |

## आर्थिक स्थिती :- तुलनात्मक तक्ता

(रु. लाखात)

| | **३१.०३.२०१४** | **३१.०३.२०१५** | **३१.०३.२०१६** |
|---|---|---|---|
| बँकेच्या ठेवी | २०३५.५४ | २३१६.९६ | २६४८.२८ |
| बँकेची कर्जे | ११७६.०० | १५५३.३४ | १७११.९४ |
| बँकेचा एकूण व्यवसाय | ३२११.५४ | ३८७०.३० | ४३६०.२२ |
| बँकेची कर्जे व ठेवी यांचे गुणोत्तर प्रमाण (सी.डी.रेश्यो) | ५७.७७ % | ६७.०४ % | ६४.६४ % |
| बँकेचे एकूण कर्मचारी | १४ | १४ | १४ |
| व्यवसाय प्रती कर्मचारी | २२९.४० | २७६.४५ | ३११.४४ |
| बँकेचा वर्षअखेर नफा | ३५.०९ | ५१.३४ | ६२.५१ |
| प्रती कर्मचारी नफा | २.५१ | ३.६७ | ४.४७ |
| खेळते भांडवल | २५२७.२२ | २८७७.१५ | ३३३७.५५ |
| कर्मचारी खर्च | २८.९९ | ३०.३३ | ३६.९७ |
| कर्मचारी खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | १.१५% | १.०५% | १.११% |
| बँकेचे निव्वळ मालमत्ता मूल्य | ३२७.७७ | ३८६.४० | ४७०.४८ |

## बँकेचा गेल्या १० वर्षांचा प्रगतीचा तक्ता

(रु. लाखात)

| तपशील | भाग | राखीव निधी | ठेवी | कर्जे | गुंतवणूक | एकूण उत्पन्न | एकूण खर्च | निव्वळ नफा | खेळते भांडवल | एकूण सभासद | एकूण कर्मचारी | लाभांश | लेखा परिक्षण वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | २०८.५३ | ९६.३४ | २६४८.२८ | १७११.९४ | ९७३.२९ | ३७१.०६ | ३०८.५५ | ६२.५१ | ३३३७.५५ | ६३२६ | १४ | शिफारस १२% | अ |
| २०१५ | १७६.१५ | ७६.९० | २३१६.९६ | १५५३.३४ | ८७३.४८ | ३१९.१० | २६७.७६ | ५१.३४ | २८७७.१५ | ६१८४ | १४ | १२% | अ |
| २०१४ | १५७.७० | ६१.८४ | २०३५.५४ | ११७६.०० | १००२.८० | २५८.३४ | २२३.२५ | ३५.०९ | २५२७.२२ | ५९२४ | १४ | १२% | अ |
| २०१३ | १४४.७६ | ४८.५४ | १८२९.२० | १०४७.११ | ८७१.८० | २२९.६० | १९५.९३ | ३३.६७ | २२५९.९० | ५७७० | १२ | १२% | अ |
| २०१२ | १३०.०३ | ३४.२४ | १५५४.४३ | ९८०.९९ | ६५०.३१ | १९२.३७ | १५७.२३ | ३५.१४ | १९३६.५० | ५६३० | १२ | १२% | अ |
| २०११ | ११६.०४ | २३.२० | १३८७.६२ | ८४८.११ | ५९३.७४ | १५१.८७ | ११९.७५ | ३२.१२ | १७२८.६९ | ५४०७ | १२ | १२% | अ |
| २०१० | १०१.०२ | १७.३२ | १०९२.७६ | ६६८.८६ | ४८५.७४ | ११८.२१ | ९४.७६ | २३.४५ | १३७७.४४ | ५१३८ | १२ | १२% | अ |
| २००९ | ८५.२५ | ११.७९ | ७७३.२९ | ५१७.०८ | ३३६.७५ | १०२.४२ | ८०.३७ | २२.०५ | १०३७.७० | ४८८५ | १२ | १०% | अ |
| २००८ | ८०.९३ | ८.६६ | ६३६.१४ | ४३२.४३ | २८६.७५ | ८९.६५ | ५५.५० | ३४.१५ | ८४३.१९ | ४७४३ | ९ | ७% | अ |
| २००७ | ७७.३९ | ८.६४ | ५२६.८० | ३७२.०० | २७४.१४ | ५७.९० | ५०.७४ | ७.१६ | ७०१.०६ | ४५४५ | ८ | -- | क |

# INTERNAL AUDITOR'S REPORT

We have audited the attached Balance Sheet of ***SINDHUDURG SAHAKARI BANK LTD.,*** as at 31st March, 2016 and also the foregoing Profit & Loss Account of the Bank for the year ended upto that date in which are incorporated the returns of *Head Office & Branch* audited by us. These financial Statements are the responsiblility of the bank's Management. Our resposibility is to express an opinion on these financial statements based on our audit.

We conducted our Audit in accordance with auditing standards generally accepted in India. Those standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An Audit includes, examining on test basis, evidences supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by management, as well as evaluating the overall financial statement presentaion. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

Further to our above comments and subjects to the scope of our audit as laid down by the members we report that.

1. We have obtained all the information and explanation which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.

2. In our opinion, Proper books of account as required by the Act, Rules and Bye-laws of the Bank have been kept by the Bank, so far as appears from our examination of the books.

3. The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank.

4. In our opinion, and to the best of our infromation and according to the explanations given to us, the accounts read with the notes thereon including Significant Accounting Policies mentioned therein, give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view :-

   a) In the case of Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March, 2016 and

   b) In the case of the Profit and Loss Account, of the profit for the year ended on the date.

**For S. S. Rane & Co.**
Chartered Accountants
Sd/-
**(CA Sanjay Rane)**

Date : 21-06-2016
Place : Mumbai

# STATUTORY AUDIT REPORT

(For the year ended 31st March, 2016)

We have audited the annexed Balance Sheet of **SINDHUDURG SAHAKARI BANK LIMITED,** (hereinafter referred to as 'the Bank') as at 31st March, 2016 and also the annexed Profit & Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of the Bank. These financial statements are the responsibility of the Bank management. Our responsibility is to express an opinin on these financial statements based on our audit.

We conducted our audit in accordance with auditing standards generally accepted in India. Those Standards required that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements. An audit includes examining on a test basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by management, as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion. On the basis of the audit indicated above and as required by Section 30 of the Banking Regulation Act, 1949 as applicable to Co-operative Societies, we report that;

We have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory;

In our opintion, proper books of account as required by the law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books

The transactions of the Bank, which have come to our notice, have been within the competence of the Bank;

The Balance Sheet and the Profit & Loss Account dealt with by this Report, are in agreement with the books of account;

In our opinion and to the best of our information and according to the explanation given to us, the accounts given a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India;

1) In the case of Balance Sheet of the state of affairs of the Bank as at 31st March, 2016 and

2) In the case of Profit and Loss Account of the Profit for the year ended on that date.

The Bank has been awarded **"A"** Audit classification for the year 01.04.2015 to 31.03.2016.

**For GADKARI & CO..**
**Chartered Accountant**
**Prop.C.A. K S Gadkari**
**Panel No. A-13221**
**Membership No.-F15679**

**Place : Mumbai**
**Date : 11-07-2016**

# सन २०१६-२०१७ चे महसुली व भांडवली अंदाज पत्रक

(रु. लाखात)

| जमा | २०१५-१६ अंदाज | २०१५-१६ पूर्तता | २०१६-१७ अंदाज | नावे | २०१५-१५ अंदाज | २०१५-१६ पूर्तता | २०१६-१७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | २६५.०० | २८४.७९ | ३३०.०० | ठेवीवरील व्याज | १९०.०० | १८२.९३ | २२०.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ७५.०० | ७३.१० | ८०.०० | कर्मचारी पगार | ३५.०० | ३६.९८ | ४३.०० |
| इतर जमा | २०.०० | १३.१७ | २०.०० | आस्थापना खर्च | ३९.०० | ४४.७२ | ५५.०० |
| बुडीत व संशयित कर्ज निधी अधिकतम तरतूद | | | | घसारा | ६.०० | ६.२२ | ७.५० |
| | | | | आयकर | ३०.०० | २८.०० | ३०.०० |
| | | | | तरतुद | ०.०० | ९.७० | ९.५० |
| | | | | निव्वळ नफा | ६०.०० | ६२.५१ | ६५.०० |
| **एकूण** | **३६०.००** | **३७१.०६** | **४३०.००** | **एकूण** | **३६०.००** | **३७१.०६** | **४३०.००** |

| देणे | २०१५-१६ अंदाज | २०१५-१६ पूर्तता | २०१६-१७ अंदाज | येणे | २०१५-१६ अंदाज | २०१५-१६ पूर्तता | २०१६-१७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल | १९०.०० | २०८.५३ | २३०.०० | रोख व बँकांतील शिल्लक | ३५०.०० | ५९०.८९ | ५५०.०० |
| राखीव व इतर निधी | ४२५.०० | ४२०.०९ | ४७०.०० | गुंतवणूक | १०००.०० | ९७३.२९ | ११५०.०० |
| ठेवी | २५००.०० | २६४८.२८ | २९५०.०० | कर्जे | १७५०.०० | १७११.९४ | २०००.०० |
| देणे व्याज | ४५.०० | ४०.१४ | ४५.०० | येणे व्याज | १३५.०० | १६७.०८ | १००.०० |
| इतर देणी | ८०.०० | १३३.१३ | १४०.०० | स्थावर मालमत्ता | २५.०० | २२.७३ | ३०.०० |
| | | | | इतर येणी | ४०.०० | ४६.७७ | ७०.०० |
| नफा | ६०.०० | ६२.५३ | ६५.०० | | | | |
| **एकूण** | **३३००.००** | **३५१२.७०** | **३९००.००** | **एकूण** | **३३००.००** | **३५१२.७०** | **३९००.००** |

| ३१-०३-२०१५ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| | **१) भाग भांडवल** | | |
| | **अधिकृत भांडवल** | | |
| १०,००,००,०००.०० | (४०,००,००० भाग प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे) | | १०,००,००,०००.०० |
| | **वसूल भाग भांडवल** | | |
| १,७६,१५,०५०.०० | (८,३४,१३४ भाग प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे) | | २,०८,५३,३५०.०० |
| | **२) राखीव व इतर निधी** | | |
| ७६,८९,६७०.०० | गंगाजळी | ९६,३३,७३८.०० | |
| ८२,००,०००.०० | इमारत निधी | ९७,००,०००.०० | |
| ४७,५०,०००.०० | बुडीत व संशयास्पद कर्ज निधी | ५१,००,०००.०० | |
| २,५९,०००.०० | सभासद कल्याण निधी | ३,००,०००.०० | |
| ४०,०००.०० | धर्मादाय निधी | ६५,०००.०० | |
| ३,४०,०००.०० | गुंतवणूक घसारा निधी | ५,००,०००.०० | |
| ३,८०,०००.०० | उत्तम जिंदगी तरतूद | ४,२५,०००.०० | |
| २,९०,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | ४,००,०००.०० | |
| २,१५,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | २,५०,०००.०० | |
| ४,००,०००.०० | लाभांश समकरण निधी | ४,५०,०००.०० | |
| ५०,०००.०० | निवडणूक निधी | १,५०,०००.०० | |
| २५,०००.०० | शैक्षणिक निधी | ५०,०००.०० | |
| २५,०००.०० | तंत्रज्ञान विकास निधी | ७०,०००.०० | |
| -- -- | रौप्य महोत्सवी निधी | २,००,०००.०० | २,७२,९३,७३८.०० |
| | **३) ठेवी** | | |
| १४,४८,१०,६५१.०० | अ) मुदत ठेव | १७,६७,८८,५४९.०० | |
| ६,१६,८१,४४३.७५ | ब) बचत ठेव | ५,८५,४७,१४३.७० | |
| १,३१,९३,३५१.४५ | क) चालू ठेव | १,७७,७१,३२०.२१ | |
| ५४,९८,०४५.०० | ड) आवर्त ठेव | ६५,७७,०६१.०० | |
| ६५,१२,१०३.०० | इ) दैनंदिन ठेव | ५१,४३,५९०.०० | २६,४८,२७,६६३.९१ |
| २७,१९,७४,३१४.२० | **पुढील पानावर** | | ३१,२९,७४,७५१.९१ |

## मुंबई ४०० ०१२.

अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१-०३-२०१५ | मालमत्ता व येणी | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| ५५,२२,७७०.०० | १) रोख शिल्लक | | २१,३३,९९३.०० |
| | २) बँकांतील शिल्लक | | |
| | अ) चालू खाती | | |
| ६७,३७,३२९.५० | म.रा.स. बँक लि., फोर्ट शाखा | ९२,८१,१४८.२४ | |
| २३,११८.१० | मुं. जि. म. स. बँक लि., लालबाग शाखा | २,८९,०८३.१० | |
| ४,१२५.०० | मुं. जि. म. स. बँक लि., फोर्ट शाखा | ०.०० | |
| २,३०,३५,०२२.१२ | मुं. जि. म. स. बँक लि., फोर्ट शाखा (ओ.डी.) | २,८६,८२,८१०.६४ | |
| ४४,७५८.०८ | एच. डी. एफ. सी. बँक लि. | ४४,७५८.०८ | |
| ५१,२१,२५५.९८ | आय. डी. बी. आय. बँक लि. | १,८६,५७,६२१.०२ | ५,६९,५५,४२१.०८ |
| | ३) गुंतवणूक | | |
| ६,३८,८३,०००.०० | अ) शासकीय रोखे पुस्तकी किंमत | ७,३८,७६,०००.०० | |
| | दर्शनी किंमत ७,५०,००,०००.०० | | |
| | बाजारी किंमत ७,५७,२०,४८६.१२ | | |
| | ब) सहकारी संस्थाची भाग पत्रे | | |
| १,०००.०० | म. रा. स. बँक लि. | १,०००.०० | |
| १,०००.०० | मुं. जि. म. स. बँक लि. | १,०००.०० | |
| | क) मुदतीच्या ठेवी | | |
| ६३,२७,७७८.०० | मुं. जि. म. स. बँक लि. फोर्ट शाखा | ६३,२७,७७८.०० | |
| ४४,९७,६२१.०० | मुं. जि. म. स. बँक लि., लालबाग शाखा | ४४,९७,६२१.०० | |
| २८,००,०००.०० | मुं. जि. म. स. बँक लि., ना. म. जोशी मार्ग | २८,००,०००.०० | |
| ९७,००,०००.०० | आय. डी. बी. आय. बँक | ९७,००,०००.०० | |
| १,३७,७३८.०० | महानगर को-ऑप. बँक लि., लालबाग शाखा | १,२६,०५६.०० | ९,७३,२९,४५५.०० |
| १२,७८,३६,५१५.७८ | पुढील पानावर | | १५,६४,१८,८६९.०८ |

| ३१-०३-२०१५ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| २७,१९,७४,३१४.२० | **मागील पानावरुन...** | | ३१,२९,७४,७५१.९१ |
| -- -- | **४) वसुलीसाठी आलेली बिले** (उलट बाजू प्रमाणे) | | |
| | **५) देणे व्याज** | | |
| ३९,२०,३५८.०० | मुदत ठेव | | ४०,१३,८७१.०० |
| १,४२,१३,४५७.५६ | **६) थकीत व्याज निधी** | | १,४७,१५,४४३.५६ |
| | **७) इतर देणी** | | |
| २७,४०,४७४.०० | लाभांश | २७,०९,७११.०० | |
| ३,५८,५९३.०० | पे ऑर्डर | १५,०५,८४२.०० | |
| १,३३,५८०.०० | सभासदत्वासाठी अनामत | १७,८००.०० | |
| १२,६८,८६०.०० | प्रॉव्हिडंट फंड | १५,४३,९४०.०० | |
| ०.०० | सरचार्ज देणे | ४,६१०.०० | |
| १७,४७,९५८.५८ | इतर देणे | १९,३६,४८८.३६ | |
| ४,३५,०००.०० | ग्रॅज्युईटी | ५,५०,०००.०० | |
| ०.०० | सेवा कर | ३९,९२३.०० | |
| ०.०० | ग्रॅच्यूईटी देणे व्याज | ५,१५,५७५.०० | |
| ०.०० | सभासदत्वाची देणे रक्कम | २५,३००.०० | |
| ०.०० | टी.डी.एस्. देणे | ६,८१,६४६.०० | |
| ०.०० | डिमांड ड्राफ्ट देणे | ७,९७,१२६.३७ | १,०३,२७,९६१.७३ |
| | **८) आयकर तरतूद** | | |
| २५,००,०००.०० | सन २०१५-१६ आयकर तरतूद | | २८,००,०००.०० |
| | **९) नफा तोटा खाते** | | |
| ५१,३३,९५३.५१ | सन २०१५-१६ चा निव्वळ नफा | ६२,५१,२३६.८२ | |
| २,४०३.७२ | जमा - मागील वर्षाचा शिल्लक नफा | १,८५७.२३ | ६२,५३,०९४.०५ |
| | संभाव्य देणी तरतूद | | १,८५,०००.०० |
| ३०,४४,२८,९५२.५७ | **पुढील पानावर** | | ३५,१२,७०,१२२.२५ |

| ३१-०३-२०१५ | मालमत्ता व येणी | | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|---|
| १२,७८,३६,५१५.७८ | **मागील पानावरुन...** | | | १५,६४,१८,८६९.०८ |
| | **४) कर्जे** | | | |
| | **अ) अल्प मुदतीची कर्जे** | | | |
| २,३६,०१,३८६.७१ | रोखपत | २,९६,२१,७२६.८३ | | |
| २,७५,९१,९८१.१० | अधिकर्ष | ३,८२,५३,२७९.१५ | | |
| १,३१,५३,२८०.०० | सोने | ९२,९५,४३७.०० | | |
| १,६१,२५,१५०.०० | कायम ठेव, रा.ब.पत्रे, दै. ठेव | १,६३,८२,६५९.०० | | |
| १९,३०,३१३.०० | आयुर्विमा पत्रे | १६,५५,२२४.०० | ९,५२,०८,३२५.९८ | |
| | **ब) मध्यम मुदतीची कर्जे** | | | |
| | जमीनजुमला | | | |
| १,६८,४९,७२१.०० | व्यापार व उद्योगधंदा | २,२३,९९,६५५.०० | | |
| १८,०९,१०५.०० | वाहन तारण | १३,१८,७५९.०० | | |
| ८,८४,०८०.०० | गृहपयोगी वस्तू | ८,८२,५४१.०० | | |
| २,३३,५०,०४०.६६ | वैयक्तिक, कर्मचारी कर्जे | २,६३,१६,५३०.६६ | | |
| २,४८,१००.०० | घर दुरुस्ती कर्जे | २६,९०,४८४.०० | | |
| १,५२,१४,९७५.०० | गहाण कर्जे | १,१७,९२,०४७.०० | ६,५४,००,०१६.६६ | |
| | **क) दिर्घ मुदतीची कर्जे** | | | |
| १,४५,७५,७०४.०० | गृह कर्जे | | १,०५,८५,७९७.०० | १७,११,९४,१३९.६४ |
| | **५) येणे व्याज** | | | |
| १,४२,१३,४५७.५६ | अ) अनुत्पादित कर्जावरील | | १,४७,१५,४४३.५६ | |
| ९,४२,१६९.४४ | ब) गुंतवणुकीवरील | | १९,९२,७८४.२८ | १,६७,०८,२२७.८४ |
| -- -- | **६) वसुलीसाठी आलेली बिले** (उलट बाजू प्रमाणे) | | | |
| २९,८३,२५,९७९.२५ | **पुढील पानावर** | | | ३४,४३,२१,२३६.५६ |

| ३१-०३-२०१५ | भांडवल व देणी | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| ३०,४४,२८,९५२.५७ | मागील पानावरुन... | | ३५,१२,७०,१२२.२५ |
| ३०,४४,२८,९५२.५७ | **एकूण** | | ३५,१२,७०,१२२.२५ |

आमच्या आजमितीस अहवालाप्रमाणे

सही/-

**किशोर शंकर गडकरी** करिता मे. गडकरी ॲन्ड कंपनी

सनदी लेखापाल

शासन नामिका क्र. (Panel Number) अ-१३२२१

नोंदणी क्र. एफ् - १५६७९ - संस्था नोंदणी क्र. १०२८९० डब्ल्यू.

मुंबई

दिनांक : ११-०७-२०१६

# मुंबई ४०० ०१२.

**अखेरचे ताळेबंद पत्रक**

| ३१-०३-२०१५ | मालमत्ता व येणी | | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|---|
| २९,८३,२५,९७९.२५ | **मागील पानावरुन...** | | | ३४,४३,२१,२३६.५६ |
| | **७) स्थावर मालमत्ता** | | | |
| | अ) फर्निचर | | | |
| १४,४१,३६७.५० | मागील ताळेबंदाप्रमाणे | १४,४१,३६७.५० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ४,२८,८१८.०० | | |
| | | १८,७०,१८५.५० | | |
| | वजा : घसारा | १,९४,३९१.०० | १६,७५,७९४.५० | |
| | **ब) संगणक** | | | |
| ५,७२,३१८.३२ | मागील ताळेबंदाप्रमाणे | ५,७२,३१८.३२ | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ४०,०००.०० | | |
| | | ६,१२,३१८.३२ | | |
| | वजा : घसारा | ३,७८,४३५.०० | २,३३,८८३.३२ | |
| | **क) कार्यालयीन सामग्री** | | | |
| २,७४,१८०.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | २,७४,१८०.०० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ०.०० | | |
| | | २,७४,१८०.०० | | |
| | वजा : घसारा | ३३,६५६.०० | २,४०,५२४.०० | |
| | **ड) विद्युत जोडणी** | | | |
| १,३९,५९३.५० | मागील ताळेबंदाप्रमाणे | १,३९,५९३.५० | | |
| | जमा : चालू वर्षातील खरेदी | ०.०० | | |
| | | १,३९,५९३.५० | | |
| | वजा : घसारा | १६,४२३.०० | १,२३,१७०.५० | २२,७३,३७२.३२ |
| | **८) इतर मालमत्ता** | | | |
| ५,५०,०००.०० | जागेसाठी अनामत रक्कम | | ५,५०,०००.०० | |
| ६,५००.०० | दूरध्वनी अनामत | | ६,५००.०० | |
| ८८,०६०.०० | छपाई व स्टेशनरी | | ५५,८००.०० | |
| ११,६७०.०० | चिकट मुद्रांक | | ६,५९०.०० | |
| ३९,३२२.०० | येणे खाते | | ५,४९७.०० | |
| १,७९,९६२.०० | आगाऊ खर्च तरतूद | | १,५४,०००.०० | |
| -- -- | डिपा. येणे खाते | | ७,९७,१२६.३७ | १५,७५,५१३.३७ |
| | **९) आयकर** | | | |
| २५,००,०००.०० | अ) सन २०१५-२०१६ चा आगाऊ कर | | २८,००,०००.०० | |
| ३,००,०००.०० | ब) सन २०१४-१५ आयकर परतावा येणे | | ३,००,०००.०० | ३१,००,०००.०० |
| ३०,४४,२८,९५२.५७ | **एकूण** | | | ३५,१२,७०,१२२.२५ |

**श्री. हरिष बा. परब**
अध्यक्ष

**श्री. दिवाकर रा. दळवी**
उपाध्यक्ष

**श्री. मोहन भा. तळेकर**
संचालक

**श्री. अ. व. प्रभुदेसाई**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. प्रकाश रा. वराडकर**
संचालक

| ३१-०३-२०१५ | खर्च | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| | **१) दिलेले व्याज** | | |
| | अ) ठेवींवरील | | |
| १,३३,६६,३५९.०० | मुदत ठेवींवर | १,४९,६१,६६४.०० | |
| ५,९९,६३७.०० | आवर्त ठेवींवर | ६,९१,३६४.०० | |
| २१,९८,२१५.८२ | बचत ठेवींवर | २३,६९,५४४.०० | |
| १,४५,०८८.०० | दैनंदिन ठेवीवर | २,७०,७१७.०० | १,८२,९३,२८९.०० |
| १,१९,७१६.०० | ब) अधिकर्ष व्याज | | ३८,९८८.०० |
| | **२) कर्मचारी पगार व भत्ते** | | |
| ३०,३२,८०३.०० | पगार | | ३६,९७,२६४.०० |
| | **३) भाडे, कर, विमा, दिवाबत्ती व इतर** | | |
| ६,९८,०००.०० | भाडे | ७,७२,०००.०० | |
| ३४,०१०.०० | विमा | ९३,०९८.०० | |
| २,५४,८९०.०० | दिवाबत्ती (Electricity Charges) | २,८३,०९३.०० | ११,४८,१९१.०० |
| ८,४९०.०० | **४) कायदे सल्लागार शुल्क** | | ५५,०००.०० |
| | **५) टपाल व दूरध्वनी** | | |
| १०,०८०.०० | टपाल | ३४,४७८.०० | |
| ८४,३४०.०० | दूरध्वनी | ८९,४८६.०० | १,२३,९६४.०० |
| | **६) लेखन सामग्री, छपाई व जाहिरात** | | |
| २,१५,८८६.०० | लेखन सामग्री व छपाई | १,४३,८२८.०० | |
| ५१,६००.०० | जाहिरात | ६०,५१५.०० | २,०४,३४३.०० |
| | **७) लेखापरीक्षण शुल्क** | | |
| १,०८,५६८.०० | सरकारी लेखापरीक्षण | १,५०,०००.०० | |
| १,८२,८२३.०० | अंतर्गत लेखापरीक्षण | १,३६,४५०.०० | |
| ८,०००.०० | संगणक लेखापरीक्षण | २५,०००.०० | ३,११,४५०.०० |
| | **८) घसारा व दुरुस्ती** | | |
| १,६०,३३४.०० | घसारा - फर्निचर व फिक्स्चर | १,९४,३९१.०० | |
| ३,१७,६२६.०० | घसारा - संगणक | ३,७८,४३५.०० | |
| ३२,४१९.०० | घसारा - कार्यालयीन सामग्री | ३३,६५६.०० | |
| १६,४२३.०० | घसारा - जोडणी | १६,४२३.०० | ६,२२,९०५.०० |
| २,१६,४५,३०७.८२ | **पुढील पानावर** | | २,४४,९५,३९४.०० |

**या कालावधीचे नफा-तोटा पत्रक**

| ३१-०३-२०१५ | उत्पन्न | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| | **१) मिळालेले व्याज** | | |
| २,३०,२६,१४९.०९ | अ) कर्ज व आगाऊ रक्कमेवरील | | २,८४,७९,४२५.३२ |
| | ब) गुंतवणुकीवरील व्याज | | |
| १६,३३,९५७.४० | कायम ठेव | १८,७६,९९२.१७ | |
| ३३६.०० | बचत ठेवीवर | ०.०० | |
| ५४,५०,९६५.२८ | सरकारी कर्ज रोख्यावरील व्याज | ५४,३३,४७०.५० | ७३,१०,४६२.६७ |
| ६५,५८५.९० | **२) बँक कमिशन व विनिमय** | | ९४,७२४.०० |
| | **३) इतर जमा** | | |
| १६१.०० | लाभांश | १६२.०० | |
| ३,४०,७६१.४६ | इन्सिडंटल चार्जेस | ३,७६,७४९.७९ | |
| ७,८२०.०० | कर्ज अर्ज विक्री | ७,६४०.०० | |
| १,५०,९९६.५० | सर्व्हिस चार्जेस | १,२८,७२८.७५ | |
| ४७,१५५.०० | चेकबुक चार्जेस | ४६,८३२.०० | |
| २७,४१०.०० | नोटीस चार्जेस | २४,५८४.०० | |
| २,२७,०६७.८४ | चेक रिटर्न चार्जेस | २,३६,७१९.२० | |
| १५०.०० | पासबुक चार्जेस | २५०.०० | |
| ४,०५,७५९.५० | प्रोसेसिंग फी | ३,१९,३१४.७५ | |
| १९,५८३.०० | अतिरिक्त लाभांश तरतूद | ०.०० | |
| ३,१०,५००.०० | सरकारी कर्ज रोख्यावरील नफा | ८०,५००.०० | |
| १,९१,२६०.०० | सन २००८-०९ आयकर परतावा | ०.०० | |
| ४,३०६.०० | मुल्यांकन फी | ०.०० | १२,२१,४८०.४९ |
| **३,१९,०९,९२३.९७** | **पुढील पानावर** | | **३,७१,०६,०९२.४८** |

| ३१-०३-२०१५ | खर्च | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| २,१६,४५,३०७.८२ | **मागील पानावरुन** | | २,४४,९५,३९४.०० |
| | **९) इतर खर्च** | | |
| २,५०,५३९.०० | ठेव विमा योजना | २,८५,८०९.०० | |
| ३,११,३१८.०० | सर्वसाधारण सभा खर्च | ३,३८,१०५.०० | |
| १८,१२४.०० | संचालक सभा खर्च | २०,७९७.०० | |
| १,९७,६८९.०० | प्रवास खर्च | ३,५४,४२४.०० | |
| २,०३,८३१.०० | किरकोळ खर्च | १,४५,५३४.०० | |
| २,२६,५८३.०० | समाशोधन खर्च (Clearing Charge) | २,१०,२५०.०० | |
| ९,१००.०० | साफसफाई खर्च | ९,१००.०० | |
| ४३,१७४.०० | वर्गणी | १८,५१०.०० | |
| ३,०३,२५२.०० | दैनंदिन ठेव कमिशन | ३,२९,५३४.०० | |
| ७,९१०.०० | ट्रेनिंग व सेमीनार | १४,८६३.०० | |
| ३,७०,४१६.०० | दुरुस्ती खर्च | ४,८०,०११.०० | |
| ५५,५००.०० | संचालक सभा भत्ता | ४४,१००.०० | |
| १,७२८.०० | कर्मचारी वेल्फेअर फंड | ८६४.०० | |
| ५३,९७५.०० | सण व सत्कार खर्च | ७७,२२२.०० | |
| ६४,८५५.०० | प्रोफेशनल चार्जेस | १,४५,८५५.०० | |
| २,९३०.०० | वेबसाईट चार्जेस | ५,७२०.०० | |
| -- -- | लॉकर भाडे | १,५००.०० | |
| १,२००.०० | महानगर पालिका परवाना शुल्क | ४,८००.०० | |
| ३,०९६.६४ | इतर खर्च | ३,६३४.६६ | |
| ७,३५०.०० | वसूली खर्च | ०.०० | |
| १,७५,०००.०० | इमारत निधी | २,००,०००.०० | |
| ०.०० | गुंतवणूक घसारा निधी | १,००,०००.०० | |
| ०.०० | गुंतवणूक चढउतार निधी | ७५,०००.०० | |
| ०.०० | रौप्य महोत्सव निधी | २,००,०००.०० | |
| ०.०० | लाभांशाची तरतूद | २८,३६६.०० | |
| ०.०० | निवडणूक खर्च | ७०,४६३.०० | ३१,६४,४६१.६६ |
| | **१०) आयकर** | | |
| २३,०९२.०० | सन २०१४-१५ | ०.०० | |
| २५,००,०००.०० | सन २०१५-१६ | २८,००,०००.०० | २८,००,०००.०० |
| | **११) म. स. संस्था अधिनियम १९६० कलम ६५ (१) प्रमाणे तरतुदी** | | |
| २,००,०००.०० | बुडीत व संशयीत कर्ज निधी तरतूद | ३,५०,०००.०० | |
| १,००,०००.०० | उत्पादित जिंदगी तरतूद | ४५,०००.०० | ३,९५,०००.०० |
| ५१,३३,९५३.५१ | **१२) निव्वळ नफा** | | ६२,५१,२३६.८२ |
| ३,१९,०९,९२३.९७ | **एकूण** | | ३,७१,०६,०९२.४८ |

आमच्या आजमितीस अहवालाप्रमाणे

सही/-

**किशोर शंकर गडकरी** करिता मे. गडकरी ॲन्ड कंपनी

सनदी लेखापाल

शासन नामिका क्र. (Panel Number) अ-१३२२१

नोंदणी क्र. एफ् - १५६७९ - संस्था नोंदणी क्र. १०२८९० डब्ल्यू.

मुंबई

दिनांक : ११-०७-२०१६

कालावधीचे नफा-तोटा पत्रक

| ३१-०३-२०१५ | उत्पन्न | | ३१-०३-२०१६ |
|---|---|---|---|
| ३,१९,०९,९२३.९७ | मागील पानावरुन | | ३,७१,०६,०९२.४८ |
| ३,१९,०९,९२३.९७ | एकूण | | ३,७१,०६,०९२.४८ |

**श्री. हरिष बा. परब**
अध्यक्ष

**श्री. दिवाकर रा. दळवी**
उपाध्यक्ष

**श्री. मोहन भा. तळेकर**
संचालक

**श्री. अ. व. प्रभुदेसाई**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. प्रकाश रा. वराडकर**
संचालक

## NOTES ON ACCOUNTS AS ON 31-03-2016

(₹ in lakh)

i) Capital to Risk Assets Ratio (CRAR) 29.84

ii) Movement of CRAR As on 31-03-2015 29.15
As on 31-03-2016 29.84

iii) Investment
a) Book value and Face value of investment
b) Market value of Investment

| | Book Value | Face Value | Market Value |
|---|---|---|---|
| Investment in Government Securities | 738.76 | 750.00 | 757.20 |
| Total Investment | **738.76** | **750.00** | **757.20** |

c) Details of Issuer composition of non-SLR investments and non performing non-SLR investments.

❑ **Issuer Composition of Non-SLR Investments**

| **No.** | **Issuer** | **Amount** | **Extent of 'below investment grade Securities'** | **Extent of 'unrated Securities'** | **Extent of 'unrated Securities'** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | PSUs | NIL | NIL | NIL | NIL |
| 2 | FIs | NIL | NIL | NIL | NIL |
| 3 | Public Sector Banks | NIL | NIL | NIL | NIL |
| 4 | Mutual Funds | NIL | NIL | NIL | NIL |
| 5 | Other | | | | |
| | Shares of Co-op. Bank | 0.02 | NIL | NIL | 0.02 |
| | FDR with | | | | |
| | M.D.C.C. Bank | 136.25 | NIL | NIL | 136.25 |
| | I.D.B.I Bank | 97.00 | NIL | NIL | 97.00 |
| | Mahanagar Co-op. Bank | 1.26 | NIL | NIL | 1.26 |
| 6 | Provision Held towards Depreciation | NIL | NIL | NIL | NIL |

**Non performing Non-SLR Investments**

| Particulars | Amount (₹ in lakh) |
|---|---|
| Opening Balance | NIL |
| Additions during the year since 1st April | NIL |
| Reduction during the above period | NIL |
| Closing Balance | NIL |
| Total Provisions held | NIL |

iv) Advance against real estate, construction business, housing

| | |
|---|---|
| Real Estate | NIL |
| Construction Business | NIL |
| Housing | 105.86 |

v) Advance against shares and debentures NIL

vi) Advance to directors, their relatives, companies / firm in which they are interested :

a) Fund based - Directors - NIL Relatives ₹ 7.36 lakh

b) Non-fund based (Guarantees, L/C, etc.) NIL

vii) Cost of Deposit : Average cost of Deposits 7.36 %

viii) NPAs : ( ₹ in lakh)

a) Gross NPAs ₹ 65.82

b) Net NPAs ₹ 14.82

ix) Movement of NPAs i.e. Gross and net NPAs as on Balance Sheet date for the current year vis-a-vis previous year. Net NPAs Should be arrived at after deducting provisions held, interest suspense account etc.

**Movement of NPAs** ( ₹ in lakh)

| | As on 31-03-2015 | As on 31-03-2016 |
|---|---|---|
| Opening Balance | 66.67 | 57.48 |
| Addition during the year | 14.90 | 16.49 |
| | 81.57 | 73.97 |
| Less Recovery during the year | 24.09 | 08.15 |
| Gross NPA | 57.48 | 65.82 |
| Less Provision for BDDR | 47.50 | 51.00 |
| Net NPA | 9.98 | 14.82 |

x) Profitability :

| | |
|---|---|
| a) Interest income as a percentage of working fund | 10.73% |
| b) Non-interest income as a percentage of working fund | 0.39% |
| c) Operating profit as a percentage of working fund | 2.89% |
| d) Return on Assets | 1.88% |
| e) Business (Deposit + Advances) per employee | ₹ 311.44 lakh |
| f) Profit per employee | ₹ 4.47 lakh |

xi) Provision made towards NPAs, depreciation in Investment, Standerd Assets

( ₹ in lakh)

| | 31-03-2015 | 31-03-2016 |
|---|---|---|
| Provision for NPA | 2.00 | 3.50 |
| Depreciation in Investment | NIL | 1.00 |
| Standard Assets | 1.00 | 0.45 |

xii) Movement of provisions : [i.e. Provisions as on Balance Sheet date for the current year (e.g. March 31, 2016 vis-a-vis previous year e.g. March 31, 2015)]

( ₹ in lakh)

| | | 31-03-2015 | 31-03-2016 |
|---|---|---|---|
| a | Towards NPAs | ₹ 47.50 | ₹ 51.00 |
| b | Towards depreciation on investment | ₹ 3.40 | ₹ 5.00 |
| c | Towards Standard asstes | ₹ 3.80 | ₹ 4.25 |

xiii) Foreign currencey assets & Liabilities : (if applicable) N. A.

xiv) Payment of DICGC Insurance Premium : ₹ 2.86 lakh
UCBs are required to disclose whether insurance premium has been paid up to date To DICGC, indicating arrears, if any. (UBD. No. BP. 38/16.45.00/2004-05 dated March 06, 2003)

xv) Penalty imposed by RBI : (UBD. PCB. Cir. No. 40/16.45.00/2004-05 dated March 01, 2005) - NIL

UCBs are also required to disclose the penalty imposed by RBI in the 'Notes on Accounts'to their Balance Sheet.

xvi) Restructured Accounts

UCB are required to disclose in their published annual Balance Sheets, under "Notes on Accounts", information relating to number and amount of advances restructured, and the amount of diminution in the fair value of their restructured advances as per the format given below. - Nil

xvii) Fixed Assets - Valuation / Revaluation - Nil

# सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई.

# उपस्थिती दाखला

## १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

### शनिवार, दिनांक ०६ ऑगस्ट २०१६

सभासद क्र.

असे नमुद करतो / करते की, मी सिंधुदुर्ग सहकारी बँक लि., मुंबई या बँकेचा / बँकेची सभासद असून १८ व्या वार्षिक सभेस शनिवार दि. ०६ ऑगस्ट २०१६ रोजी सायं. ५.०० वाजता महात्मा गांधी सभागृह, राष्ट्रीय मिल मजदुर संघ, ग. द. आंबेकर मार्ग, परेल, मुंबई – ४०० ०१२. येथे उपस्थित आहे.

**सभासदाचे पूर्ण नांव** **सभासदाची सही**

टिप : – कृपया सभासदांनी उपस्थिती दाखला संपूर्ण तपशीलासह भरुन बँकेच्या प्रतिनिधींकडे द्यावा.

उपस्थिती दाखला न दिल्यास गैरहजर समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

# नोंदी